# प्रेसनोट दि. २३/०१/२०२१

## निगडी पोलीस ठाणे हद्दितील सराईत गुन्हेगार नामे, प्रशांत रमेश कोळी याचे टोळीवर मोका ( महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियत सन १९९९ ) अंतर्गत कारवाई केले बाबत.

श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस ठाणे यांनी श्री. मंचक इप्पर, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ यांचे मार्फतीने निगडी पोलीस ठाणे, गु.र.नं. ४९१/२०२० भादंवि कलम ३०७, ५०४, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ३(२५), क्रि.लॉ.ॲ.ॲ. ७ चे तपासामध्ये आरोपी नामे, (१) प्रशांत रमेश कोळी, वय-३२ वर्षे, रा. मिलींदनगर, ओटास्किम, निगडी, पुणे, ( **टोळी प्रमुख** ) (२) सुरज सुभाष पवार, वय-२८ वर्षे, रा. बि.नं. १४/१७, राजहंस सोसायटी, ओटास्किम, निगडी, पुणे, (३) राहुल यलप्पा कांबळे, वय-२५ वर्षे, रा. से.नं. २२, घर नं. आय/३/२, राहुलनगर, ओटास्किम, निगडी, पुणे, (४) अतुल ऊर्फ बबन भाऊसाहेब घावटे, वय-३१ वर्षे, रा. शेळकेवाडी, राजापूर, श्रीगोंदा, अहमदनगर. ( **पाहिजे आरोपी** ) यांचेविरूध्द **खुन, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत करणे, दरोडा टाकुन खुन करणे, दरोडा, पुरावा नष्ट करणे, जबरी चोरी करुन दुखापत करणे, जबरी चोरी करणे, अपहरण करणे, व बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणे त्याची विक्री करणे, असे एकुण १९ गंभीर गुन्हे पिंपरी चिंचवड शहर, पुणे शहर, पुणे ग्रामीण व अहमदनगर जिल्हा याठिकाणी दाखल आहेत.** वरील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वापर करून वर्चस्वासाठी व आर्थिक फायद्यासाठी संघटितपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियत सन १९९९ अंतर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव मा. अपर पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचेकडे पाठविला होता. मा. श्री. सुधीर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, व मा. श्रीमती. प्रेरणा कट्टे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-२, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्रसिंह गौर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांनी सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करून त्रुटींची पूर्तता करून सदरचा प्रस्ताव आदेश पारीत करणे कामी मा. अपर पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचेकडे पाठविला असता दिनांक २२/०१/२०२१ रोजी मा. श्री. रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. रामनाथ पोकळे सो, मा. श्री. सुधीर हिरेमठ सो. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा. श्री. मंचक इप्पर सो., पोलीस उप-आयुक्त सो. परिमंडळ-१, श्रीमती. प्रेरणा कट्टे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. राजेंद्रसिंह गौर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एल. एन. सोनवणे, सहायक पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस ठाणे तसेच अंमलदार पोलीस हवालदार सचिन चव्हाण, पी.सी.बी. गुन्हे शाखा, व पो.ना. संदिप दानवे, पो.ना. निलेश चासकर, निगडी पोलीस ठाणे, यांचे पथकाने केली आहे.